दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | रविवार, 12 जुलै 2026 | अंक क्र. 68 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# 'आमदार श्री शाळा' उपक्रमाची घोषणा; आष्टी-पाटोदा-शिरूरमधील शाळा रोल मॉडेल बनविणार : आ. सुरेश धस

## 'मिशन निपुण बीड'साठी शिक्षकांनी जागतिक दर्जाच्या शाळांचा संकल्प करावा : राष्ट्रपती पुरस्कार विजेते दत्तात्रय वारे

## या कार्यशाळेचा उद्देश शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे : मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान

■ **आष्टी प्रतिनिधी:**

जिल्हा परिषद बीडचा शिक्षण विभाग आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट), अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'मिशन निपुण बीड' संकल्प कार्यशाळेत शिक्षणाची गुणवत्ता, पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान तसेच सरकारी शाळांना जागतिक दर्जाच्या बनविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. कार्यशाळेत राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि आमदार सुरेश धस यांनी शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी 'आमदार श्री शाळा' या अभिनव उपक्रमाची घोषणा केली. पहिल्या टप्प्यात मतदारसंघातील उत्कृष्ट कार्य करणारे शिक्षक, ग्रामस्थ व सरपंच असलेल्या शाळा दत्तक घेऊन त्यांचा रोल मॉडेल म्हणून विकास केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके आणि संदीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली समिती स्थापन करून शाळांच्या विकासाचा रोडमॅप तयार केला जाणार आहे. त्यानंतर टप्प्याटप्प्याने आष्टी, पाटोदा आणि शिरूर कासार तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा विकसित करण्यात येतील. कोणत्याही पालकाला आपल्या पाल्याला खासगी शाळेत पाठविण्याची गरज भासू नये, यासाठी आवश्यक त्या सुविधा व अतिरिक्त शिक्षकांची पदे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान म्हणाले, "या कार्यशाळेचा उद्देश शिक्षणाची गुणवत्ता उंचावणे हा आहे. आमदार सुरेश धस यांचे दर्जेदार शिक्षणावर विशेष लक्ष असून, आता जिल्हा, तालुका आणि केंद्र स्तरावर नियमित कार्यशाळा घेऊन विद्यार्थी केंद्रित शिक्षणावर भर दिला जाईल. शिक्षकांनी प्रामाणिकपणे विद्यार्थ्यांना घडवावे, प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे."

राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक दत्तात्रय वारे म्हणाले, "सरकारी शाळांमधून विद्यार्थ्यांचे खासगी शाळांकडे होणारे स्थलांतर थांबून उलट 'रिव्हर्स मायग्रेशन' घडले पाहिजे. पालकांना इंग्रजी बोलणारी,




गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणारी मुले हवी आहेत. त्यामुळे शिक्षकांनी शिक्षणाची गुणवत्ता वाढवून शंभर टक्के विद्यार्थी साक्षर करण्याचा संकल्प करावा."

विद्यार्थी समजून घेणे, 'विषय मित्र' संकल्पना प्रभावीपणे राबविणे, विद्यार्थ्यांमध्ये सहकार्याची भावना आणि निरोगी स्पर्धा निर्माण करणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी, "सरकारी शाळाही आंतरराष्ट्रीय दर्जाच्या होऊ शकतात. असे कार्य करा की समाज तुम्हाला कायम लक्षात ठेवेल. आपल्या गावाला जगाच्या नकाशावर नेण्याचे सर्वात प्रभावी माध्यम म्हणजे आपली शाळा," असे प्रतिपादन केले. वाबळेवाडी शाळेच्या संघर्षमय काळाची आठवण करून देताना त्यांनी आमदार सुरेश धस यांनी दिलेल्या सहकार्याचा उल्लेख केला. "आष्टी-पाटोदा-शिरूरमधील शिक्षक भाग्यवान आहेत. त्यांच्या पाठीशी सह्याद्रीसारखा नेता उभा आहे," असे गौरवोद्गार काढत प्रत्येक शिक्षकाने "मी माझी शाळा जागतिक दर्जाची घडवीन" असा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यशाळेच्या शेवटी उपस्थित शिक्षकांनी 'मिशन निपुण बीड' यशस्वी करण्याचा तसेच प्रत्येक जिल्हा परिषद शाळा गुणवत्तापूर्ण, आधुनिक आणि जागतिक दर्जाची बनविण्याचा संकल्प केला. कार्यशाळेस बीड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान,डाएट प्राचार्य डॉ. अनिल मुरकुटे, शिक्षणाधिकारी डॉ. जयश्री चव्हाण, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. भागीरथी गिरी, उपशिक्षणाधिकारी मारुती जाधव, तिन्ही तालुक्यांचे गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक दत्तात्रय वारे, सोमनाथ वाळके, संदीप पवार, नितीन करडुळे, सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक, उपक्रमशील शिक्षक, विषयतज्ज्ञ शिक्षक आणि शिक्षण विभागातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर तर आभार अण्णासाहेब घोडके यांनी मानले.

---

## परभणी–हिंगोली जिल्हा मध्यवर्ती बँक निवडणूक आमदार रत्नाकरराव गुट्टे आणि राजेश पाटील गोरेगावकर यांची बिनविरोध निवड

### राजेभाऊ फड यांच्याकडून प्रत्यक्ष भेट घेऊन अभिनंदन!

■ **परभणी/हिंगोली**

परभणी-हिंगोली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीत राजकीय घडामोडींना वेग आला असतानाच, दोन महत्त्वाच्या मतदारसंघातून दिग्गज नेत्यांची संचालकपदी बिनविरोध निवड झाली आहे. गंगाखेड मतदारसंघातून माजी आमदार रत्नाकररावजी गुट्टे (काका) आणि औंढा नागनाथ मतदारसंघातून माजी आमदार राजेश पाटील गोरेगावकर यांची बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाली.

या ऐतिहासिक निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस राजेभाऊ यांनी दोन्ही नवनिर्वाचित संचालकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांचे पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक अभिनंदन केले.



सहकार क्षेत्राला नवीन गती मिळणार राजेभाऊ फड यावेळी बोलताना राजेभाऊ यांनी दोन्ही नेत्यांच्या नेतृत्वावर आणि अनुभवावर मोठा विश्वास व्यक्त केला. माजी आमदार रत्नाकरराव गुट्टे आणि राजेश पाटील गोरेगावकर यांच्या रूपाने दोन अनुभवी आणि खमके नेतृत्व जिल्हा बँकेला लाभले आहेत. त्यांच्या सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवाचा आणि कुशल नेतृत्वाचा फायदा बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नक्कीच होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या दोन्ही नेत्यांच्या माध्यमातून शेतकरी, बँकेचे सभासद आणि सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सुटण्यास मदत होईल आणि बँक प्रगतीचे नवे शिखर गाठेल. या प्रत्यक्ष भेटीदरम्यान राजेभाऊ फड यांनी दोन्ही नेत्यांना त्यांच्या आगामी यशस्वी वाटचालीसाठी आणि भावी कारकीर्दीसाठी वैयक्तिक पातळीवर भरभरून शुभेच्छा दिल्या.

## राज्यात मान्सूनचा 'ब्रेक'

### दमदार हजेरीनंतर पाऊस पुन्हा मंदावला, बळीराजा पुन्हा चिंतेत!

■ **मुंबई वृत्तसंस्था**

जून महिन्यातील प्रदीर्घ ओढ्यानंतर जुलैच्या पहिल्या आठवड्यात राज्याच्या विविध भागांत पावसाने दमदार पुनरागमन केले होते. या मुसळधार पावसामुळे अनेक जिल्ह्यांमधील जूनमधील पावसाची तूट भरून निघाली, धरणांमधील पाणीसाठ्यात वाढ झाली आणि पाणीटंचाईने होरपळणाऱ्या जनतेला मोठा दिलासा मिळाला. मात्र, हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. राज्यात पुन्हा एकदा मान्सूनचा वेग मंदावला असून, शेतकऱ्यांसमोर चिंतेचे ढग दाटू लागले आहेत.

**'एल निनो'चा मान्सूनवर प्रभाव –** हवामान तज्ज्ञांच्या मते, प्रशांत महासागरात सक्रिय होत असलेल्या 'एल निनो' या हवामान विषयक घडामोडींचा थेट परिणाम मान्सूनवर दिसून येत आहे. यामुळे महाराष्ट्रासह देशातील अनेक भागांमध्ये पावसाचा जोर ओसरला असून, येत्या काही दिवसांत पाऊस लांबण्याची (खंड पडण्याची) दाट शक्यता वर्तवली जात आहे.

#### पेरण्यांवर संकट?

यावर्षी मान्सूनच्या सुरुवातीला म्हणजेच जून महिन्यात अपेक्षेप्रमाणे पाऊस झाला नव्हता, ज्यामुळे खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या होत्या. अनेकांनी पेरण्या पुढे ढकलल्या होत्या. जुलैच्या पहिल्या आठवड्यात मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणात झालेल्या जोरदार पावसामुळे परिस्थिती सुधारली होती व शेतकऱ्यांनी सुटकेचा श्वास घेतला होता. परंतु, आता पुन्हा पाऊस गायब झाल्याने पिकांच्या वाढीवर आणि उर्वरित पेरण्यांवर संकट ओढवण्याची भीती निर्माण झाली आहे.

#### काय आहे एल निनो?

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, 'एल निनो' म्हणजे प्रशांत महासागरातील समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानात होणारी असामान्य वाढ होय. या बदलाचा जागतिक हवामानावर मोठा परिणाम होतो. भारतात जेव्हा जेव्हा एल निनो सक्रिय होतो, तेव्हा मान्सून कमकुवत होण्याची किंवा पावसाचे असमान वितरण होण्याची शक्यता लक्षणीयरीत्या वाढते.

---

# परळीचे सुपुत्र किरण गित्ते (IAS) यांच्या ऐतिहासिक नियोजनातून त्रिपुरात १.२१ लाख कोटींची विक्रमी गुंतवणूक!

## 'डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२६' मध्ये जागतिक कंपन्यांसह १० देशांच्या राजदूतांची उपस्थिती; गित्ते साहेबांच्या धोरणात्मक नेतृत्वाचे देशपातळीवर कौतुक.

■ परळी (प्रतिनिधी)

परळीचे सुपुत्र आणि त्रिपुरा शासनाचे उद्योग व वाणिज्य सचिव, माननीय श्री. किरण गित्ते साहेब (IAS) यांच्या दूरदृष्टी, उत्कृष्ट नियोजन आणि प्रशासकीय कौशल्यातून त्रिपुरा राज्याने औद्योगिक क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे. गित्ते साहेबांच्या मुख्य नियोजनातून आयोजित करण्यात आलेला दोन दिवसीय 'डेस्टिनेशन त्रिपुरा बिझनेस कॉन्क्लेव्ह २०२६' अत्यंत यशस्वीरीत्या संपन्न झाला. या परिषदेच्या माध्यमातून त्रिपुरा राज्यामध्ये तब्बल १,२१,३०३+ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक गुंतवणुकीचे उद्दिष्ट असणारे ३४२ हून अधिक सामंजस्य करार (MoUs) करण्यात आले आहेत. ईशान्य भारताला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनवण्याच्या या मोहिमेचे मुख्य सूत्रधार म्हणून किरण गित्ते साहेबांच्या नावाचा आणि नेतृत्वाचा गौरव होत आहे.

केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री आणि जागतिक दिग्गजांची उपस्थिती या भव्य परिषदेचे उद्घाटन त्रिपुराचे माननीय मुख्यमंत्री प्रा. (डॉ.) माणिक साहा यांच्या हस्ते झाले. तर भारत सरकारचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री श्री. पियुष गोयल आणि

### परळीकरांसाठी आणि महाराष्ट्रासाठी गौरवास्पद कामगिरी!

■ **त्रिपुरा मंत्रिमंडळातील सर्व प्रमुख मंत्री अनुक्रमे श्री. रतनलाल नाथ (ऊर्जा व कृषी), श्रीमती संताना चकमा (उद्योग), श्री. सुशांत चौधरी (पर्यटन), श्री. टिंकू रॉय (कामगार), श्री. शुक्ला चरण नोतिया (सहकार) आणि श्री. अनिमेश देबबर्मा (वन) यांनी गित्ते साहेबांच्या या संपूर्ण नियोजनाचे आणि गुंतवणुकीच्या धोरणाचे स्वागत केले आहे. एका छोट्याशा राज्यात थेट जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांना आकर्षित करून १.२१ लाख कोटींचा टप्पा पार करून देणारे मुख्य आयोजक हे परळीचे सुपुत्र श्री. किरण गित्ते राहिल्यामुळे, संपूर्ण बीड जिल्ह्यात आणि महाराष्ट्रात त्यांच्या या ऐतिहासिक प्रशासकीय कामगिरीचे प्रचंड कौतुक होत असून परळीची मान देशात उंचावली आहे.**

ईशान्य प्रदेश विकास व दळणवळण मंत्री श्री. ज्योतिरादित्य एम. सिंधिया यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित राहून मार्गदर्शन केले.

विशेष म्हणजे, किरण गित्ते साहेबांच्या धोरणात्मक प्रयत्नांमुळे जागतिक स्तरावरील १० देशांचे राजदूत आणि उच्चायुक्त या परिषदेला प्रामुख्याने उपस्थित होते. यामध्ये: बांगलादेश: उच्चायुक्त महामहिम श्री. एम. रियाझ हमीदुल्ला व सहायक उच्चायुक्त श्री. झिक्रुल हसन फहद फिलीपिन्स: वाणिज्यदूत सुश्री मेलिसा ॲन तेलान तिमोर-लेस्ते: राजदूत महामहिम श्री. कार्लिटो न्युनेस

लाओस: राजदूत महामहिम श्रीमती विथया झायवोंग

कझाकस्तान: उपराजदूत श्री. डारखान सेतेनोव्ह चिली: राजदूत महामहिम श्री. जुआन रोलँडो अँगुलो मॉन्साल्वे नेपाळ: प्रभारी डॉ. सुरेंद्र थापा व आर्थिक सल्लागार श्री. रवींद्र जंग थापा उझबेकिस्तान: आर्थिक सल्लागार श्री. अब्दुलअजीज अब्दुखालिलोव्ह दक्षिण आफ्रिका: उप उच्चायुक्त श्री. सेड्रिक



चार्ल्स क्रॉली जपान (JETRO): वरिष्ठ संचालक सुश्री हारुका मारुयामा यांचा समावेश होता. देशातील पहिल्या क्रमांकाच्या सुधारणांचे 'कॅबिनेट सचिवालयाकडून' कौतुक परिषदेत बोलताना भारत सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. व्ही. अनंत नागेश्वरन आणि कॅबिनेट सचिवालयाचे विशेष सचिव श्री. केशव कुमार पाठक यांनी त्रिपुरा राज्याचे विशेष कौतुक केले. 'अनुपालन कपात आणि नियमनमुक्ती उपक्रमा'अंतर्गत सर्व ५१ प्राधान्यक्रमाच्या सुधारणा पूर्ण करणारे त्रिपुरा हे भारतातील पहिले राज्य ठरले आहे. गित्ते साहेबांच्या मार्गदर्शनाखाली नोकरशाहीतील अडथळे दूर करून 'एक-खिडकी मंजुरी' (Single Window Clearance) आणि डिजिटल प्रशासनामुळे राज्याने 'व्यवसाय सुलभतेत' (Ease of Doing Business) देशात अव्वल स्थान मिळवले असून इतर राज्यांसाठी त्रिपुरा आदर्श बनले असल्याचे त्यांनी सांगितले. गुगल, सेल्सफोर्ससह नामांकित कंपन्यांची मोठी भागीदारी

या कॉन्क्लेव्हमध्ये राज्यातील आणि देशाबाहेरील १,२०० हून अधिक संस्थांमधून २,००० हून अधिक मोठे गुंतवणूकदार सहभागी झाले होते. यामध्ये आयटीसी वेलकम ग्रुप, जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (JITO), गुगल (Google), सेल्सफोर्स (Salesforce), लुलू ग्रुप इंटरनॅशनल, मॅक्लेक, अंबुजा निओटिया, पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन, एनएलसी इंडिया, जीआयझेड जर्मनी यांसारख्या बलाढ्य कंपन्यांशी आयटी, एआय, हॉस्पिटॅलिटी, वैद्यकीय शिक्षण आणि ऊर्जा क्षेत्रासाठी १० प्रमुख विशेष करारांची देवाणघेवाण झाली.

संपादकीय

# शहर आपले, जबाबदारीही आपलीच

शहराचा विकास हा एकतर्फी प्रयत्नांनी होत नाही. प्रशासनाची कार्यक्षमता, लोकप्रतिनिधींची बांधिलकी आणि नागरिकांची जबाबदारी या तीनही घटकांचा समन्वय असेल, तरच स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि सक्षम शहराची निर्मिती होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक समस्येसाठी दोषारोप करण्यापेक्षा 'माझे शहर, माझी जबाबदारी' ही भावना प्रत्येक नागरिकाने स्वीकारणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

पावसाळा सुरू झाला की शहरांतील अनेक समस्या पुन्हा एकदा समोर येतात. मुसळधार पाऊस, तुंबलेले रस्ते, चोकअप झालेली गटारे आणि नाले, वाहतुकीचा खोळंबा, कचऱ्याचे ढीग, दूषित पाणी आणि विस्कळीत नागरी सुविधा अशा अनेक अडचणी नागरिकांना दरवर्षी भेडसावतात. अशा वेळी प्रशासन, महानगरपालिका किंवा लोकप्रतिनिधींवर टीकेची झोड उठते. ही टीका काही अंशी योग्यही असते, कारण नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची आहे. मात्र प्रत्येक समस्येचे संपूर्ण खापर केवळ प्रशासनावर फोडून चालणार नाही. शहर स्वच्छ, सुरक्षित आणि सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी नागरिकांचीही तितकीच आहे. शहराच्या विकासाचा विचार केला, तर प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक हे एका त्रिकोणाचे तीन महत्त्वाचे घटक आहेत. यापैकी एक घटक निष्क्रिय राहिला, तर विकासाचा समतोल बिघडतो. प्रशासन नियोजन करते, निधी उपलब्ध करून देते, रस्ते, गटारे, पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधा पुरवते. लोकप्रतिनिधी नागरिकांच्या समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवतात, विकासकामांवर पाठपुरावा करतात आणि लोकांच्या अपेक्षा शासनापुढे मांडतात. पण या दोघांच्या प्रयत्नांना यश मिळण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असतो.

पावसाळ्यात पाणी तुंबण्याची, गटारे-नाले चोकअप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे गटारामध्ये अडकलेला कचरा. मुळातच गटारे ही घरातील पाणी, सांडपाणी वाहून जाण्याचे कार्य करत असतात. पण नागरिक याचे भान न ठेवता गटारांमध्ये, नाल्यांमध्ये घरातील लहान-मोठे अडगळीचे साहित्यही फेकून देत असतात. त्यावेळी हे सामन गटारातून वाहून जाणे शक्य नसल्याचे भानही त्यांना राहत नाही, हीच खरी शोकांतिका आहे. काही अंतरावर हे साहित्य वाहून गेल्यावर पुढे अडकते व पाणी तुंबण्याची प्रक्रिया सुरू होते आणि खापर मात्र त्या त्या महापालिका प्रशासनावर व स्थानिक लोकप्रतिनिधींवर फोडले जाते.

आज अनेक ठिकाणी गटारे आणि नाले चोकअप होण्यामागे केवळ अपुरी यंत्रणा कारणीभूत नसते. प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोल, घरगुती कचरा, बांधकामातील मलबा आणि इतर घनकचरा नाल्यांमध्ये टाकण्याची प्रवृत्ती ही मोठी समस्या आहे. पावसाचे पाणी वाहून नेणाऱ्या मार्गात कचरा अडकल्याने पाणी रस्त्यावर साचते आणि पूरस्थिती निर्माण होते. त्यानंतर प्रशासनावर टीका केली जाते. पण जर नागरिकांनी कचरा योग्य पद्धतीने विल्हेवाटीस लावला, तर अशा अनेक समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येऊ शकतात. स्वच्छता ही केवळ महानगरपालिकेची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सवय असली पाहिजे. घरासमोर, रस्त्यावर किंवा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे, प्लास्टिकचा बेजबाबदार वापर करणे, नाल्यांमध्ये घाण सोडणे किंवा सार्वजनिक मालमत्तेची नासधूस करणे या सवयी शहराला बकाल बनवतात. याउलट नागरिकांनी स्वच्छतेबाबत जागरूक राहून नियमांचे पालन केले, तर शहराचे रूप बदलू शकते. दुसरीकडे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची जबाबदारीही तेवढीच महत्त्वाची आहे.

गटारांची वेळेत साफसफाई, नाल्यांतील गाळ काढणे, कचरा व्यवस्थापन, रस्त्यांची दुरुस्ती, पावसाळ्यापूर्वी आवश्यक उपाययोजना आणि नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करणे ही त्यांची कर्तव्ये आहेत. विकासकामांमध्ये पारदर्शकता, गुणवत्तापूर्ण कामे आणि नियमित देखभाल असेल, तर नागरिकांचा विश्वास वाढतो. कार्यक्षम प्रशासन आणि संवेदनशील लोकप्रतिनिधी हे कोणत्याही शहराच्या प्रगतीचे आधारस्तंभ असतात. मात्र नागरिकांनीही केवळ टीकाकाराची भूमिका न घेता भागीदाराची भूमिका स्वीकारली पाहिजे. परिसर स्वच्छ ठेवणे, कचरा वर्गीकरण करणे, सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे, स्थानिक स्वच्छता मोहिमांमध्ये सहभागी होणे, चुकीच्या प्रकारांना विरोध करणे आणि नागरी नियमांचे पालन करणे या छोट्या वाटणाऱ्या गोष्टी शहराच्या विकासात मोठे योगदान देतात. विकसित देशांमध्ये प्रशासनाबरोबर नागरिकही तितक्याच जबाबदारीने वागतात. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणे, वाहतुकीचे नियम पाळणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि नागरी शिस्त पाळणे ही त्यांची संस्कृती बनलेली आहे. भारतातील शहरांनाही अशाच लोकसहभागाची गरज आहे. केवळ शासन बदलून किंवा अधिकारी बदलून शहरांचे चित्र बदलत नाही; त्यासाठी नागरिकांची मानसिकता बदलणे अधिक आवश्यक असते. खरे तर शहर ही केवळ शासनाची मालमत्ता नसून प्रत्येक नागरिकाचे सामूहिक घर असते. घर जसे स्वच्छ आणि नीटनेटके ठेवतो, तसेच सार्वजनिक ठिकाणांबाबतही आपुलकीची भावना निर्माण झाली पाहिजे. नागरिक आणि प्रशासन यांनी एकमेकांचे विरोधक नव्हे, तर विकासाचे सहकारी म्हणून काम केले, तर अनेक नागरी समस्या सहज सोडवता येतील. पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या नागरी समस्यांचा उद्रेक हा राजकारणाचा अथवा चिखलफेकचा विषय असूच शकत नाही. पावसामुळे निर्माण झालेल्या दुर्घटनांनी रहिवासी आधीच त्रस्त झालेले असतात. त्यांना समस्येवर तोडगा हवा असतो, अडचणीतून निघण्यासाठी मदत हवी असते. या काळात जो मदत करेल, तोच त्यांचा खरा तारणहार असतो.

# जागतिक मराठी परिवार महाराष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा भागीदार

**मुंबई : प्रतिनिधी**

जगभरातील मराठी समाज हा महाराष्ट्राच्या विकासाचा महत्त्वाचा भागीदार असून त्यांचे ज्ञान, अनुभव, जागतिक संपर्क आणि गुंतवणूक राज्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोलाची ठरणार आहे. त्यामुळे जगभरातील मराठी परिवाराशी अधिक परिणामकारक, सातत्यपूर्ण आणि संस्थात्मक संबंध प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे आयोजित 'मध्यपूर्व आणि आफ्रिका डायस्पोरा आउटरीच' या ऑनलाईन संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी राजशिष्टाचार विभागाचे सचिव डॉ. राजेश गवांदे, विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, कतार, ओमान, बहरीन, कुवेत, दक्षिण आफ्रिका, केनिया, नायजेरिया, युगांडा आदी देशांतील महाराष्ट्र मंडळांचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राजशिष्टाचार विभागाकडे थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) तसेच डायस्पोरा अफेअर्स अँड आउटरीच या नव्या जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. या माध्यमातून जगभरातील महाराष्ट्राच्या परिवाराशी दृढ, सातत्यपूर्ण आणि परिणामकारक संबंध निर्माण करण्याचे काम सुरू असून जागतिक मराठी समाजाला राज्याच्या विकास प्रक्रियेत सक्रिय भागीदार म्हणून जोडण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.महाराष्ट्राची ताकद केवळ राज्याच्या भौगोलिक सीमांमध्ये नसून जगभर आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राचा गौरव वाढविणाऱ्या प्रत्येक मराठी व्यक्तीमध्ये असल्याचे सांगून त्यांनी उद्योग, व्यापार, आरोग्य, शिक्षण, तंत्रज्ञान, वित्त, संशोधन आणि उद्योजकता अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मराठी बांधवांचे अभिनंदन केले. परदेशात राहूनही मराठी भाषा, साहित्य, संस्कृती आणि परंपरा जतन करणाऱ्या महाराष्ट्र मंडळे व सामाजिक संस्थांच्या कार्याचेही राजशिष्टाचार मंत्री रावल यांनी कौतुक केले.मध्यपूर्वेतील सध्याच्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तेथील मराठी बांधवांच्या सुरक्षिततेबाबत महाराष्ट्र शासन संवेदनशील असल्याचे सांगून सर्वांनी स्थानिक प्रशासनाच्या सुरक्षा सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले. संयुक्त अरब अमिरातीतील इंडियन पीपल्स फोरम महा हेल्पलाइनने संकटाच्या काळात १,२०० भारतीय पर्यटकांना सुरक्षितपणे मायदेशी परतण्यास मदत केल्याबद्दल संबंधित संस्था आणि सदस्यांचे मंत्री रावल यांनी विशेष अभिनंदन केले. आफ्रिका खंडातील काही भागांमध्ये इबोला आणि इतर संसर्गजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्थानिक प्रशासन आणि आरोग्य यंत्रणांच्या सूचनांचे पालन करून स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.राज्यात उद्योग, पायाभूत सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता, हरित ऊर्जा, लॉजिस्टिक्स, पर्यटन, कृषी, अन्न प्रक्रिया आणि स्टार्टअप्स या क्षेत्रांत वेगाने प्रगती होत असल्याचे सांगून महाराष्ट्राला केवळ आर्थिक गुंतवणूक नव्हे, तर जागतिक मराठी समाजाचे ज्ञान, अनुभव, कौशल्य आणि जागतिक संपर्क जाळेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून साकार होत असलेला 'महाएनआरआय कनेक्ट' हा उपक्रम जगभरातील मराठी समाजाला महाराष्ट्र शासनाशी जोडणारे प्रभावी डिजिटल व्यासपीठ ठरणार असून गुंतवणूक, उद्योग, ज्ञानाची देवाणघेवाण, सांस्कृतिक आदानप्रदान आणि शासनाशी थेट संवादासाठी त्याची महत्त्वपूर्ण भूमिका राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले. मागील आठवड्यात अमेरिकेतील मराठी बांधवांशी संवाद साधल्यानंतर आता मध्यपूर्व आणि आफ्रिका खंडातील मराठी समाजाशी संवाद साधण्याची संधी मिळाल्याचा आनंद व्यक्त करत त्यांनी हा संवाद यापुढेही नियमितपणे सुरू राहील.

अशी ग्वाही दिली. महाराष्ट्र शासनाला जगभरातील मराठी समाजाशी केवळ संपर्क ठेवायचा नसून कायमस्वरूपी, विश्वासाचे आणि विकासाभिमुख नाते निर्माण करायचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात मध्यपूर्व आणि आफ्रिका खंडातील विविध महाराष्ट्र मंडळांच्या प्रतिनिधींनी आपले अनुभव, सूचना आणि अपेक्षा व्यक्त केल्या. शासनाशी सातत्यपूर्ण संवाद आणि अधिक समन्वयाची अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# कोकण विभागातील धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा

**नवी मुंबई प्रतिनिधी**

कोकण विभागातील प्रमुख धरणांमधील पाणीसाठ्यात अत्यंत समाधानकारक वाढ झाली असून, अनेक भागांतील पाणीबाणी मिटण्यास मोठी मदत होणार आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमधील लघु, मध्यम व मोठ्या प्रकल्पांमध्ये उपयुक्त जलसाठा उपलब्ध झाला असून, काही धरणांमधून नियंत्रित विसर्गही सुरू करण्यात आला आहे. यामुळे आगामी काळात शेतीसह नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत होणार असल्याचे संकेत मिळत आहे.

ठाणे जिल्ह्यातील बारवी धरणात १६५.७१ दशलक्ष घनमीटर (द.ल.घ.मी.) तर तानसा धरणात ११३.६०८ द.ल.घ.मी. उपयुक्त साठा उपलब्ध झाला आहे. जिल्ह्याला सर्वाधिक पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा धरणात तब्बल ५३६.८८३ द.ल.घ.मी. इतका विस्तीर्ण जलसंचय झाला असून, मोडकसागर धरणातही १०७.३५१ द.ल.घ.मी. पाणीसाठा नोंदवला गेला आहे. पालघर जिल्ह्यातील धामणी धरणात १८४.२९५ द.ल.घ.मी. इतका पाणीसाठा उपलब्ध झाला असून, कवडास धरणात ८.२ द.ल.घ.मी. इतका जलसाठा कायम आहे.रायगड जिल्ह्यातील हेटवणे प्रकल्पाची साठवण क्षमता ५.१२ टीएमसी इतकी आहे. हा प्रकल्प आजतागायत ७८.९८ टक्के इतका भरला आहे. याशिवाय रायगडमधील एकूण २८ लघु प्रकल्पांपैकी २० प्रकल्प पूर्ण क्षमतेने म्हणजेच १०० टक्के भरून ओसंडून वाहत आहेत.रत्नागिरी जिल्ह्यातील गडनदी धरणात ६६.३८७ द.ल.घ.मी. पाणीसाठा असून या धरणातून ४१.४५८ क्युमेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. तसेच अर्जुना मध्यम प्रकल्पात ५४.०० द.ल.घ.मी. आणि नातूवाडी धरणात १८.३७७ द.ल.घ.मी. साठा उपलब्ध असून नातूवाडीमधून ५.४७१ क्युमेक्स वेगाने विसर्ग केला जात आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी प्रकल्पात ४४७.३६९ द.ल.घ.मी. एवढा पाणीसाठा निर्माण झाला आहे. अरुणा धरणात ९२.०२५ द.ल.घ.मी. साठा असून ६.५२ क्युमेक्सने विसर्ग सुरू आहे. कोर्ले-सातंडी मध्यम प्रकल्पात २५.४७४ द.ल.घ.मी. साठा जमा झाला असून तिथून २२.२८ क्युमेक्स इतका पाण्याचा विसर्ग सुरू आहे, तर देवघर धरणात देखील ९८.०२ द.ल.घ.मी. इतका समाधानकारक जलसाठा उपलब्ध आहे.

# 3 ऑगस्ट रोजी लोकशाही दिन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे ऑगस्ट महिन्याचा लोकशाही दिन 3 ऑगस्ट 2026 रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये 17 जुलै 2026 पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या (Website) मुख्यपृष्ठावर जलद दुवे (Quick Links) आयकॉनवर उपलब्ध असून ती अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.15 ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही छापील प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे. अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावयाची आहे.विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे.

# निवृत्त होत असल्यास सदस्यांनी जनतेच्या हितासाठी केलेले काम मोलाचे

**मुंबई : प्रतिनिधी**

विधान परिषदेतून निवृत्त होत असलेल्या सदस्यांनी त्यांच्या कार्यकाळात जनतेच्या हितासाठी केलेले काम आणि विधान परिषदेच्या कामकाजात त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असल्याचे प्रतिपादन एकनाथ शिंदे यांनी दिले. विधान परिषदेतून निवृत्त होत असलेले सदस्य सतीश चव्हाण, अरुण लाड, अभिजित वंजारी, किरण सरनाईक आणि जयंत आसगावकर या पाच सदस्यांना निरोप देण्यात आला.

शिक्षण, सहकार, सामाजिक कार्य, शिक्षकांचे प्रश्न, युवकांचे प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने आवाज उठविणाऱ्या सदस्यांच्या कार्याचा गौरव करत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या सदस्यांच्या लोकसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, जनहिताच्या प्रश्नांवर सर्वांनी दाखविलेली बांधिलकी आणि सभागृहाच्या परंपरेचा जपणूक करण्याची भूमिका कायम स्मरणात राहील.जयंत आसगांवकर यांनी शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सातत्याने अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले. शिक्षण व्यवस्थेचा सखोल अभ्यास आणि शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत.सतीश चव्हाण यांनी विद्यार्थी, बेरोजगार युवक आणि मराठवाड्याच्या विकासाशी निगडित प्रश्न सातत्याने सभागृहात मांडले. युवकांना न्याय मिळावा आणि रोजगाराच्या संधी वाढाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचा उल्लेख उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केला. अभिजित वंजारी यांनी सामान्य नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. विद्यार्थी चळवळ, शिक्षण, समाजकारण तसेच कोविड-१९ काळात वैद्यकीय मदत, अन्नधान्य आणि गरजूंना दिलेल्या सहाय्यामुळे त्यांनी लोकाभिमुख नेतृत्वाची ओळख निर्माण केल्याचे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काढले. अरुण लाड यांनी सहकार, शिक्षण आणि समाजकारण या क्षेत्रांत दिलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख करत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले सहकारी संस्थांबरोबरच रक्तदान शिबिरे, साक्षरता अभियान, महिला सक्षमीकरण, आरोग्य शिबिरे आणि पर्यावरण जनजागृतीसारख्या उपक्रमांमुळे त्यांनी समाजाशी कायमची नाळ जपली असल्याचे म्हणाले. किरण सरनाईक यांनी विधान परिषदेत विविध विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करून लोकप्रतिनिधी म्हणून वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या शांत, संयमी आणि अभ्यासू भूमिकेचेही उपमुखमंत्री शिंदे यांनी कौतुक केले.विधान परिषदेतून निवृत्त होणाऱ्या. या सदस्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून केलेल्या समर्पित कार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून सार्वजनिक जीवनातील त्यांची पुढील वाटचाल अधिक यशस्वी होवो, समाजसेवेची त्यांची परंपरा अशीच अखंड सुरू राहो आणि जनतेच्या सेवेसाठी त्यांचे योगदान भविष्यातही कायम राहो, अशा शुभेच्छा उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या. यावेळी अन्य सदस्यांसह निवृत्त होत असलेल्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# निवडणूक खर्च सादर न केल्याने 111 उमेदवारांना "अनर्हत" घोषित

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता एकूण १७०० उमेदवारांनी निवडणूक लढविली होती. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार व कायदेशीर तरतुदींनुसार निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने विहित मुदतीत आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब सादर करणे बंधनकारक आहे. तथापि, आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्या अहवालानुसार ११२ उमेदवारांनी आपल्या निवडणूक खर्चाचा हिशोब विहित मुदतीत सादर केलेला नाही. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार, सदर उमेदवारांना अनर्ह घोषित करण्यासाठीचा नमुना सहा मधील प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून या कार्यालयास सादर करण्यात आला होता.

सदर उमेदवारांना नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार आपली बाजू मांडण्याची संधी देण्यासाठी या कार्यालयात दिनांक २५/०५/२०२६ व दिनांक २९/०६/२०२६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीदरम्यान काही उमेदवार उपस्थित होते व काही उमेदवार हे अनुपस्थित राहिले. तथापि, सुनावणीस उपस्थित असलेल्या उमेदवारांनी राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळेत खर्चाचा हिशोब सादर केलेला नाही. परिणामी, सदर उमेदवारांनी राज्य निवडणूक आयोगाच्या कायदेशीर आदेशांचे व तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना राज्य निवडणूक आयोगाने प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार वृ महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ मध्ये निवडणूक लढवूनही विहित मुदतीत खर्चाचा हिशोब सादर न केल्याबद्दल, उमेदवाराला पुढील ३ (तीन) वर्षांच्या कालावधीसाठी महानगरपालिकेची निवडणूक लढविण्यास व महानगरपालिका सदस्य होण्यास "अनर्ह " घोषित करण्यात येत आहे. या अधिकारा अन्वये : संतोष राधेश्याम तिवारी, रामहरि तांबारे, दिपक शिवाजी हनवते, अपूर्वा विनोद हुदकर, भूवनेश पांचाळ (बंडया दादा), उज्वला प्रमोद वैती, नौशीन रफीक खालिफा, जयनेश शेशमनी मिश्रा, अरबाझ अस्लम शेख, अभिषेक बक्षी, नरेंद्र रमणलाल परमार, अरबाझ अस्लम शेख, सिध्दी संतोष शेलार , नडार जयमृगण टी, शिंदे नम्रता अविनाश, जयेश राजेंद्र पांडे, अँड. फालगुनी भ्रम्हाबट्ट, अफ्रीन मोहम्मद आसिफ टोळे, उर्मिला रविशंकर गुप्ता, गुव्वार परमजीत सिंग, बबनराव मदाने, शेहनाझ मीस (टिचर), अजबीना ताज मोहम्मद शेख, सुरेश गीगा दाबी, प्रविना शिवाजी सावंत, मोहम्मद यासीन मकनोझीया (अलताफ आजवा),, जयेश मालोजी तांबे, राझीया बेगम मोहम्मद इब्राहीम खान, शाह दिलीप जयंतीलाल, संगिता प्रितम तुळस्कर ,फारहीन मोहम्मद जमशेद खान, चंद्रपाल मुलकीतसिंग तांडे, चंद्रीका राकेश पांडे, दीक्षीता दिनेश वीघने, सबाना अनवर शेख, आरती पोपट बागुल, संतोष शेट्टी, महिमा बाबुलनाथ शर्मा, सनी राहुल सावंत, तुरेराव कुणाल भगवान, राहुल विलास बारवे, जाधव राजेश रमेश, विजय बबन वाघमारे, सुशिल रामकृष्ण शिंदे, विनोद दगडू साळवे, निशा भरत सोनावणे, प्रतिक्षा राजू घुगे , वर्षा कैलास थोरात, निधी राजेश अडारकर, विजया भिवा गित, आनंद अनिल कोठावर्डे, सुप्रिया मनोज जाधव (जगताप), शबाना मुमताज शेख, रमेश बाबुराव अहिवले, निकीता अभित पोल, नविता रवि लोखंडे, पार्वती सुरेश देवर, साबिया सैयद खान, फातीमा नाझीर हुसैन सय्यद, प्रकाश विष्णु कुंभार, शिरोमणी येशु जगली, अम्रपाली विद्याधर डावरे, सोहन दादू सदामस्त, सुरेखा सुरेश जाधव, सौरभ गुलाब साठे, तांबे विकास शामराव, रश्मी राजेश चींदेरकर, सोनाली शंकर बनसोडे, उस्मान मलीक, पार्वती शरद भानुशाली, लीना हरिष शुक्ला, अनिल समादादे, अब्दुल रहमान खान, शमा होमाम्मद मोबीन शेख, हाजरा बेगम हैदर अली शेख, मोहम्मद कासम शेख, सोनाली स्वपनिल म्हात्रे, अमिना अरिफ सय्यद, पोल राफेल, सुशिलकुमार सिंग, सुभाष पार्वती कृष्ण पांघरे, अर्चना विलास पवार, खान तनविर अब्दूल खलिप, नरिअम्माल गूतूरामलिंगम तेवर, रोबीनसन मारान नायगम, सैफ अहमद शेख, शेख यासमिन एम. हानिफ, फर्नानडीस रेनल रिची, हुसेना बानो मुबारक शाह, हाफीझ सय्यद, भुपण चंद्रशेखर नागवेकर, बाळकृष्ण विशराम कांबळे, पल्लवी महेंद्र मुंगेकर, अंकिता रोहन तांबे, अजित गंगाधर धोत्रे, अजित मधुसुदन मुंगेकर, मोहम्मद शकील कुरेशी, नितीन गोविंद व्यास, सलमा साजिद खान, बॅप्टिस्टा रेनिये जेरार्ड, मुकादम प्रविणवानो अब्दुल सुहेल, सामीनबानो शाहीद अक्तर सिद्दीकी , नरारीन रिफाकत हुरेन, अन्सारी शामशुद्दीन गुलाम दस्तगीर, अलिया फातीमा सरदार, गांधी प्रशांत विजय, झाकीर हुसेन गुप्ता, प्रविण नरेंद्र कोलाबकर, दिनेश वल्लभदास रामय्या, संदीप तानाजी भोज, पराब प्रतिभा मनोज या उमेदवारांना " अनर्ह "घोषित करण्यात आले आहे. सदर अनर्हतेचा कालावधी हा आदेश जारी झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)



# महागांव ते जनुना - करंजखेड व हिवरा कासारबेहळ हा मुख्य रस्ता खड्डेमय झालेला असल्याने ह्या रस्त्याची तात्काळ दुरुस्ती करा

## अन्यथा आंदोलनाचे हत्यार उपसण्याचा इशारा

महागाव | प्रतिनिधी

महागांव ते जनुना- करंजखेड हा रस्ता हिवरा आणि कासारबेहळ या गावांना देखिल जोडलेला आहे. त्या भागातील नागरीकांना जाणे येणे साठी एकमेव रस्ता असल्याने हा रस्ता सध्या अत्यंत खड्डेमय झाला असून नागरीकांना ये-जा करतांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या खड्यामध्ये पाणी साचल्याने अपघात होण्याची दाट शक्यता त्यामुळे नागरीकांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरीक, रुग्ण, तसेच वाहन चालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

या रस्त्याची अनेक दिवसांपासून दुरुस्ती करण्याची मागणी असतांना देखिल ह्या रस्त्याच्या दुरुस्ती करीता अद्याप प्रशासनाने कुठलीही पावले उचललेली नाही. ह्या रस्त्याची अतिशय दैनिय अवस्था झाली असून रस्त्याने पायी चालणे देखिल कठिण झाले आहे. त्यामुळे नागरीकांच्या व विद्यार्थ्यांच्या सुरक्षीततेच्या दृष्टीने ह्या खड्डेमय झालेल्या रस्त्याची तात्काळ आठ दिवसाच्या आत दुरुस्ती करण्यात यावे. अन्यथा नाईलाजास्तव आम्हाला आपल्या कार्यालयासमोर येवून धरणे आंदोलन अथवा आमरण उपोषणाची हत्यार उपसण्याची वेळ येऊ देऊ नका असा सज्ज इशारा तहसीलदार यांना निवेदनातून ॲड. लक्ष्मीकांत अशोक भांगे,भिमराव गणपत भालेराव,वैभव भारत ठाकरे,चंद्रकांत अशोक माटाळकर,देवानंद भिकाजी राठोड

सुधिर सुरेश अडकिने,राजाराम बळीराम ठाकरे,मंगेश बापुराव भांगे,सुदाम शिवाजी भांगे, गोकुळ राम राठोड, विकास परसराम राठोड, उमेश पंडीत ढगे,लक्ष्मण मारोती जाधव,सतिष राजाराम कदम यांच्याकडून सज्जन इशारा देण्यात आला आहे




# बीडच्या मुलींनी रग्बी स्पर्धेत पटकावले रौप्यपदक: देशभरातील दिग्गज संघांना दिली कडवी झुंज,



**बीड |** तेलंगणा राज्यातील गाचीबावली स्टेडियमवर ६ आणि ७ जुलै रोजी पार पडलेल्या १८ वर्षांखालील राष्ट्रीय रग्बी स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या मुलींच्या संघाने चमकदार कामगिरी करत रौप्यपदकावर मोहोर उमटवली. विजयी संघात बीडमधील पाच मुलींचा समावेश असून देशभरातील दिग्गज संघांना कडवी झुंज देत संघाने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली.

ऐतिहासिक यशात बीड जिल्ह्यातील मोरया क्रीडा मंडळाच्या पाच खेळाडूंनी अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली. या स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे नेतृत्व बीडच्या कीर्ती किरण जाधव हिने केले. उपकर्णधारपदाची धुरा आदिती सखाराम लोंढे हिने सांभाळली. त्यांच्यासह दिपाली दिलीप ताठे, श्रुती दत्ता हांडगे, राधा हरिदास दिवे या खेळाडूंनी संपूर्ण स्पर्धेत आक्रमक आणि बचावात्मक खेळ केला. त्यांनी राज्याला पदक मिळवून दिले. ग्रामीण भागातील मर्यादित सोयी-सुविधांवर मात करत या खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर आपली छाप सोडली आहे. प्रशिक्षक नितीन येळवे, अशोक चौरे, बीडचे कारागृह पोलीस शोएब खाटीक, साईनाथ राजे यांचे मार्गदर्शन लाभले. या दैदिप्यमान यशाबद्दल जिल्हा रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष इसाक शेख, उपाध्यक्ष रमेश सानप, कोषाध्यक्ष हरिभाऊ बांगर, सचिव महेश घुले, कार्याध्यक्ष नितीन येळवे यांनी खेळाडूंचे स्वागत केले.

# पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयात लोकसंख्या दिन साजरा




सिरसाळा | अतुल बडे

येथील श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयातील भूगोल विभाग व रासेयो विभागाच्या वतीने 11 जुलै 2026 हा लोकसंख्या दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. बालाजी साबळे यांनी लोकसंख्या दिनाचा इतिहास, लोकसंख्या दिन साजरा करण्या पाठीमागचा हेतू, लोकसंख्या वाढीची कारणे, परिणाम व उपाययोजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. भारतासारख्या देशाला वाढती लोकसंख्या ही परवडणारी नाही. भारतातील लोकसंख्या वाढीसाठी सामाजिक कारणे कारणीभूत आहेत. मुलगा हाच वंशाचा दिवा हा दृष्टिकोन समाजाचा बदलणे आवश्यक आहे. महिलांचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा वाढला तर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणता येऊ शकते. अशा पद्धतीचे मत प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. ए.व्ही. जाधव यांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी अनेक उपाययोजना सांगितल्या व लोकसंख्येमुळे निर्माण होणाऱ्या समस्यावर प्रकाश टाकला. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी अन्सारी आर. आय. यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. जयदीप सोळुंके यांनी केले. तर आभार डॉ. ए.बी.वाळके यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी,विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी सर्वांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रचार व प्रसार करण्याचा संकल्प सर्वांनी केला.

## आषाढी वारीसाठी उपक्रम, अनेक वारकऱ्यांना मिळाला दिलासा

# वारकरी सोहळा:70 स्वयंसेवकांच्या चमूने 400 हून अधिक वारकऱ्यांची केली चरणसेवा

**बीड |** मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष तथा सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढी वारीनिमित्त आयोजित करण्यात आलेला चरणसेवा उपक्रम बुधवार रोजी गेवराई येथील चिंतेश्वर मंदिर व टीपीएस कॉलनी परळी येथे उत्स्फूर्त प्रतिसादात यशस्वीपणे पार पडला.

मुक्ताईनगर येथून आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत मुक्ताबाई पालखी दिंडीची परंपरा अनेक वर्षांपासून अखंड सुरू आहे सोबतच गजानन महाराज पालखी दिंडी शेगाव ही बीड जिल्ह्यात परळी या ठिकाणी मुक्कामस येते . या दिंडीसोबत महाराष्ट्रातील शेकडो वारकरी पायी वारी करून श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे जातात. वारकऱ्यांच्या पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करणे, त्यांच्या पायांची व स्नायूंची योग्य काळजी घेणे तसेच आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयराजे पंडित यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबईचे विशेष कार्य अधिकारी तथा कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक, डॉ. स्वानंद सोनार तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉनसन, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि जिल्हा आरोग्य आधिकारी डॉ उल्हास गंडाळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपक्रमाचे नियोजन करण्यात आले. या उपक्रमात सुमारे ७० स्वयंसेवकच्या चमूने ४०० हून अधिक वारकऱ्यांना चरणसेवा व आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी यांनी आरोग्य तपासणी व आवश्यक औषधोपचार उपलब्ध करून दिले. तसेच फिजिओथेरपी, आयुष उपचार पद्धतीद्वारे सेवा आणि पंचकर्म उपचारही देण्यात आले. या सेवेमुळे पायी प्रवासामुळे आलेला शारीरिक थकवा दूर होऊन पुढील वारीसाठी नवचैतन्य आणि ऊर्जा मिळाल्याची भावना अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केली.

यांनी घेतला सहभाग : सदरील उपक्रम यशस्वी करण्यासाठी गुरु माऊली आयुर्वेदिक महाविद्यालय माळीपरगाव तालुका माजलगाव , आर बी अट्टल महाविद्यालय,गेवराई , जय भवानी महाविद्यालय गढी येथील एनएसएस विध्यार्थी, सार्वजनिक आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड, यांचे मोलाचे सहकार्य लाभले. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेडचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य कागदे, समन्वयक गणेश गिराम, गेवराई तालुका आरोग्य अधिकारी डॉ गोंदीकर अभय ,परळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ मोरे , अशोक लोखंडे यांनी उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
● बीड, रविवार, 12 जुलै 2026
Last page




## पूर्वीच्या मॅपिंग बरोबरच सध्याचे मॅपिंगही अतिशय महत्त्वाचे,
# "गणना प्रपत्र" भरणे आवश्यक
### SIR ला हलक्यात घेऊन नका, मॅपिंग नाही केले तर शासकीय सवलती होणार बंद - प्रा. पवन मुंडे



**परळी वैजनाथ (नितीन ढाकणे)**

निवडणूक आयोगाकडून एसआयआर (विशेष सखोल पुनरिक्षण) नोंदणी चालू आहे. पूर्वी झालेली मॅपिंग ही ONLINE PREE SIR मॅपिंग होती त्या मध्ये फक्त 2002 व 2024 यादीतील नावांची जुळवणी केली गेली तर आताची मॅपिंग ही निवडणूक आयोगाची मुख्य मॅपिंग प्रक्रिया आहे. त्यामुळे SIR ला हलक्यात घेऊन नका, मॅपिंग नाही केले तर शासकीय सवलती बंद तर होतीलच पण मतदान यादीतून कायमचे नाव कमी होऊ शकते त्यामुळे प्रत्येक वार्डावार्डात आपल्या बीएलओला भेटून एसआयआर प्रक्रिया पूर्ण करुन घेणे महत्वाचे आहे. प्रत्येकाने आपले व आपल्या कुटुंबातील व्यक्तींचे "गणना प्रपत्र" भरणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्येकाने काळजीने या कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन परळी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती,भाजपाचे गटनेते तथा भाजपाचे BLA- 1 परळी विधानसभा प्रमुख प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या सूचनेनुसार SIR प्रक्रिये साठी परळी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते कामाला लागले आहेत. पूर्वीचे मॅपिंग प्रक्रिया ही ONLINE PREE SIR मॅपिंग होती मात्र त्या मॅपिंग प्रमाणेच आताही स्वतः सहित संपूर्ण कुटुंबाचे "गणना प्रपत्र" भरून देत मॅपिंग करणे गरजेचे आहे. नागरिकांनी या राष्ट्रीय प्रक्रियेत सहभागी होऊन एसआयआर प्रक्रिया पूर्ण करुन घेणे आवश्यक आहे. जे नागरिक SIR मॅपिंग करणार नाहीत त्यांची नावे मतदान यादीतून उडतील आणि त्यांना कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ मिळणार नाही. सध्या परळी मतदारसंघात सर्वत्र सरकारी BLO आणि भाजपचे BLA2 घरोघरी जाऊन मतदारांचे पुनरावलोकन (मॅपिंग) करत आहेत. नागरिकांनी त्यांच्याशी संपर्क साधून "गणना प्रपत्र" आपल्या कुटुंबासहित भरणे आवश्यक आहे. असे आवाहन परळी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती तथा भाजपाचे BLA- 1 परळी विधानसभा प्रमुख प्रा. पवन मुंडे यांनी केले आहे.

**परळी नगरपरिषदेचे बांधकाम सभापती, भाजप गटनेते तथा विधानसभा BLA-१ प्रा. पवन मुंडे यांनी नागरिकांना ही प्रक्रिया सहज न घेता, स्वतःसह संपूर्ण कुटुंबाची मॅपिंग तातडीने करून घेण्याचे आवाहन केले आहे.**

#### 'गणना प्रपत्र' भरणे बंधनकारक

**प्रत्येक नागरिकाने आपल्या प्रभागातील/वार्डातील बीएलओ (BLO) ला भेटून आपल्या कुटुंबाचे 'गणना प्रपत्र' भरणे अत्यंत आवश्यक आहे.**

#### निष्काळजीपणाचे परिणाम

**मॅपिंग न केल्यास मतदान यादीतून नाव कायमचे कट होऊ शकते. नाव वगळल्यास भविष्यात मिळणाऱ्या सर्व शासकीय सवलती आणि योजनांचा लाभ बंद होईल.**

#### तर तहसीलचे हेलपाटे मारावे लागतील: प्रा. पवन मुंडे

"निवडणूक आयोगाची सध्या सुरू असलेली 'एसआयआर' (SIR) मॅपिंग ही मुख्य आणि अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. नागरिकांनी या राष्ट्रीय कार्यात अजिबात निष्काळजीपणा करू नये. जर कुटुंबाचे 'गणना प्रपत्र' भरून मॅपिंग पूर्ण केले नाही, तर मतदार यादीतून नाव कायमचे वगळले जाऊ शकते. एकदा नाव कमी झाले की ते पुन्हा समाविष्ट करण्याची प्रक्रिया अत्यंत क्लिष्ट आहे; नागरिकांना तहसील कार्यालयात चकरा माराव्या लागतील. तसेच नाव कट झाल्यास सर्व शासकीय योजनांचा लाभही बंद होईल. त्यामुळे परळी मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाने तात्काळ आपल्या भागातील बीएलओ (BLO) किंवा यंत्रणेशी संपर्क साधून ही प्रक्रिया काळजीपूर्वक पूर्ण करावी." **प्रा. पवन मुंडे (बांधकाम सभापती - परळी नगरपरिषद, भाजपा गटनेते तथा BLA-१ प्रमुख)**

## कासारी पुलाच्या संथ कामाविरोधात युवा नेते सागर चव्हाण यांची गांधीगिरी; कामगारांचा सत्कार करून व्यक्त केला निषेध

**आष्टी | प्रतिनिधी :**

आष्टी–अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील कासारी नदीवरील पुलाचे काम गेल्या अनेक दिवसांपासून अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने वाहनचालक, शेतकरी व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर युवा नेते सागर चव्हाण यांनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने गांधीगिरी करत संबंधित कंत्राटदाराच्या निष्काळजीपणाचा निषेध नोंदविला.

यावेळी सागर चव्हाण यांनी पुलावर काम करणाऱ्या कामगारांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. "आमचा विरोध कामगारांना नसून कामाच्या संथ गतीला आणि



संबंधित कंत्राटदाराच्या नियोजनशून्य कारभाराला आहे," अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

सागर चव्हाण म्हणाले की, आष्टी–अहिल्यानगर हा महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असून या मार्गावर दररोज हजारो नागरिकांची व वाहनांची वर्दळ असते. कासारी नदीवरील पुलाचे काम रखडल्यामुळे वाहतूक विस्कळीत होत आहे. पावसाळ्यात नागरिकांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला असून कामाला तातडीने गती देणे आवश्यक आहे.

गांधीगिरीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या अनोख्या आंदोलनाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. संबंधित यंत्रणांनी आणि कंत्राटदाराने या आंदोलनाची गंभीर दखल घेऊन पुलाचे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन अधिक तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सागर चव्हाण यांनी दिला.

या अनोख्या आंदोलनाची परिसरात मोठी चर्चा रंगली असून नागरिकांनीही पुलाचे काम लवकर पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

## खासदार पुत्रास अटक करण्यासाठी केजमध्ये दीड तास जनआक्रोश मोर्चा

**केज** | विलास घुले हत्या प्रकरणी खासदार पुत्र सौरव बजरंग सोनवणे यास अटक करावी. सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करावी. प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे. या मागण्यांसाठी टाकळी ग्रामस्थांनी शुक्रवारी दुपारी १२ वाजता डॉ. आंबेडकर चौक ते तहसील कार्यालयापर्यंत जनआक्रोश मोर्चा काढला. दोन तास चाललेल्या या मोर्चात विलास घुले यांची आई, पत्नी, भाऊ सहभागी झाले.

टा या प्रकरणातील पुरवणी जबाबात खासदार पुत्र सौरव बजरंग सोनवणे याने आरोपींना पळून जाण्यास मदत केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यानुसार एसआयटीने खा. बजरंग सोनवणे यांच्या पवनसुत निवासस्थानी जाऊन सीसीटीव्ही फुटेज घेतले होते. सौरव सोनवणे याची चार तास चौकशी झाली होती. अटक न झाल्याने नातेवाईक आक्रमक झाले.

मोर्चात विलास घुले यांची पत्नी सुषमा घुले, भाऊ रमेश घुले, आई आशाबाई घुले यांच्यासह नातेवाईक, महिला, पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले. सौरव बजरंग सोनवणे यास अटक करून चौकशी करावी. या गुन्ह्यात सहभागी अन्य आरोपींना अटक करावी. सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करावी. प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे. आरोपी व नातेवाईकांकडून केस मागे घेण्यासाठी दबाव टाकून धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप करण्यात आला. दहा आरोपी कोठडीत विलास घुले हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी रामेश्वर गायकवाड, बाबासाहेब कदम, संतोष कदम, सूरज उर्फ भैय्यासाहेब गायकवाड, मंगेश कदम, शुभम गायकवाड, नवनाथ कदम, दीपक कदम, अजय कदम, राजकुमार मोरे या दहा जणांची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.

दीड तास बस वाहतूक बंद जन आक्रोश मोर्चाला आक्रमक स्वरूप असल्यास बसवर दगडफेकी सारख्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने मोर्चाच्या कालावधीत दीड तास बस वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. अंबाजोगाई, लातूर कडून येणाऱ्या एसटी बस या बसस्थानकात थांबवून ठेवल्या होत्या. तर मांजरसुंब्याकडून येणाऱ्या एसटी बस या मस्साजोगला थांबवून ठेवल्या होत्या.

### इनरव्हील क्लब परळीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदभार स्वीकार समारंभ

## वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश

**परळी/प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब, परळीच्या नूतन पदाधिकार्यांचा पदभार स्वीकार समारंभ शुक्रवारी स्वातीनगर येथील धुमाळ यांच्या अनंतकुंज निवासस्थानात उत्साहात पार पडला. यावेळी नूतन अध्यक्षा आशा उत्तम धुमाळ यांनी मावळत्या अध्यक्षा ॲड. शुभांगी गित्ते यांच्याकडून अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला.ॲड.गित्ते यांनी आशा धुमाळ यांना चार्टर पिन प्रदान करून पदभार सुपूर्द केला.
यावेळी उपाध्यक्षा उमा समशेट्टी, सचिव शैलजा बाहेती, आयएसओ तारा अग्रवाल, कोषाध्यक्षा सुरेखा बेंडसूरे, इडिटर अनिता धुमाळ तसेच मधुबाला कांकरिया यांनीही आपल्या पदाची सूत्रे स्वीकारली.
समारंभास परळीच्या माजी नगराध्यक्षा सरोजनी हालगे, विद्या मंडलेचा, संगीता रेवडकर, मनीषा खाकरे, विजया दहिवाळ, विद्या गुजर, सुनीता वाघमोडे, सरला उपाध्याय, सुशीला राजमाने, सुचिता करमाळाकर, शोभना सौंदळे, उर्मिला कांकरिया, श्रद्धा हालगे, सविता दुबे, रुक्मिणी अग्रवाल, सरोजा धुमाळ आदींसह क्लबच्या सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.
यावेळी प्रा. डॉ. अर्धापूरे यांनी मार्गदर्शन केले. सामाजिक कार्यात महिलांची भूमिका आणि इनरव्हील क्लबच्या उपक्रमांचे महत्त्व आशा धुमाळ यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमानंतर हनुमान मंदिर परिसरात नूतन पदाधिकार्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.




